# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४१३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–१५/०७/२०१६.

**१) फसवणुक केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १४/०५/०१५ ते दि. ०५/०९/०१५ चे दरम्यान आरोपीने लाखनी येथील गट क्र. २४२/५अ/१ या गटातील ६०० चौ.फुट प्लॉट स्वतःच्या मालकीचा आहे असे फिर्यादी सौ. प्रिया निकेश हुमणे वय २९ वर्ष रा. लाखनी हिला सांगुन तिच्या सोबत १,००,०००/–रू. मध्ये प्लॉटचा सौदा केला व ८०,०००/–रू. फिर्यादि कडुन घेवुन करार नामा लिहुन घेतला व बाकिचे २०,०००/–रू. हे रजिस्ट्री करते वेळी देण्याचे ठरले. परंतु नंतर फिर्यादिने सदर प्लॉट बाबत माहिती प्राप्त केली असतांना प्लॉट हा अभिशेख मन्साराम शामकुवर रा. लाखनी यांच्या मालकीचा असल्याचे ७/१२ उता–यावरून समजले. यावरून फिर्यादिने आरोपीला दिलेल्या पैश्याची मागणी केली तर आरोपीने टाळाटाळ करून फसवणुक केली. याबाबत फिर्यादिने मा. जेएमएफसी कोर्ट लाखनी येथे दि. ११/०७/०१६ रोजी अर्ज करून जेएमएफसी कोर्ट लाखनी यांचे आदेश क्र. ७६/१६ दि. १२/०७/०१६ अन्वये कलम १५६(३) जाफौ. प्रमाणे आदेश पारीत झाल्याने पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४२०,४६८ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोनि. चकाटे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) शाळेतुन सामानाची चोरी. :–**

दिनांक १३/०७/२०१६ चे १८.०० वा. ते १४/०७/२०१६ रोजी ०९.४० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने जिल्हा परिषद पुर्व माध्यमीक शाळा कवलेवाडा येथील लाकडी खिडकीचा पल्ला कापुन खिडकितुन आत प्रवेश केला. व शाळेच्या रूममध्ये ठेवलेला १ एसीएल कंपनीचा कॅम्पुटर मॉनीटर, सिपीयु, केबल, बॅटरी, किबोर्ड कि. ३०.०००/–रू. चा माल चोरून नेला. असे फिर्यादी सेवकराम मंगरुजी किरणापुर वय ४८ वर्ष, रा. जिल्हा परीषद पुर्व माध्यमिक शाळा मुख्याध्यापक ह. म. महालगाव यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी. :–**

दिनांक १३/०७/२०१६ रोजी ११.०० ते १२.३० वा. दरम्यान फिर्यादी कैलास परसराम मुलवंडे, वय २५ वर्ष, रा. सुंदरगाव त. मौदा. जि. नागपुर हा लग्ना करीता बावनकुळे मंगल कार्यालय पट्रोल पंप ठाणा येथे आपली मोटार सायकल क्र. एम एच ४० एक्यु ७३३४ काळया रंगाची लाल पट्टा असलेली कि. २५,०००/रु. ची मंगल कार्यालयाच्या आवारात ठेवली होती. ही कोणीतरी अज्ञात चोरानी चोरुन नेली. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. जवाहरनगर हे करीत

४) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :–

दिनांक १४/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, पवनी, व अडयाळ येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी दारू कि. १५००/–रू. व ९०० मिली. देशी दारू कि. २५०/–रू. असा तसेच जुगारातुन २४६३ असा एकुण कि. ४,२१३/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.